मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचे 23 विद्यार्थी ठरले लाखाचे मानकरी!

## 90 टक्के व त्यापुढे गुण मिळवणारे एकूण 23 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 लाख रुपये मिळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च 2024 मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्डाच्या परीक्षेचा राज्याचा निकाल आज (सोमवारी) ऑनलाइन जाहीर झाला. 90% व त्यापुढे गुण मिळवणारे एकूण 23 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 लाख रुपये मिळणार आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका माध्यमिक विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना महापालिकेमार्फत रोख रकमेच्या स्वरूपात बक्षीस देण्यात येते.



दहावी परीक्षेचा निकाल सोमवारी (दि.27) रोजी इंटरनेटवर प्रसिद्ध झाला. महापालिका माध्यमिक विद्यालयांचा निकाल यंदा 95.36 टक्के लागला आहे. सन 2008-2009 पासून ही योजना पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे राबविण्यात येत आहे. सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून या योजनेत व धोरणात बदल करण्यात आला. त्यानुसार, महापालिकेच्या 17 माध्यमिक विद्यालयातील 90 टक्क्यांपेक्षा जादा गुण घेणाऱ्या सात विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रूपये बक्षीस देण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका अंतर्गत मराठी माध्यम व उर्दू माध्यमाच्या शाळांनी एस.एस. सी. बोर्डाच्या परीक्षेत चांगल्या निकालाची परंपरा या वर्षी सुद्धा चालू ठेवलेली आहे. विद्यार्थ्यांना मनपा द्वारे पुरविण्यात येणा-या सुविधा, स्मार्ट सिटी अंतर्गत डिजिटल झालेले वर्ग तसेच चांगल्या पद्धतीने अध्यापन करणारा अध्यापक वर्ग व या सर्वांवर नियंत्रण करणारे मुख्याध्यापक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून हा निकाल गाठणे शक्य झाले आहे.

### चार शाळांचा निकाल 100 टक्के

**» महापालिकेच्या १८ शाळांमध्ये चार शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. त्यामध्ये माध्यमिक विद्यालय कासारवाडी, संत तुकारामनगर, खराळवाडी व माध्यमिक विद्यालय क्रीडा प्रबोधिनी या शाळांचा समावेश आहे. तर ९० टक्क्यांच्या पुढे भोसरी माध्यमिक विद्यालय (९५.३९), पिंपळे गुरव (९५.१४), काळभोरनगर (९१.७२), पिंपळे सौदागर (९१.७७) नेहरूनगर (९४.११), केशवनगर (९६.९६), निगडी (९८.९७), फुगेवाडी (९७.५०) व लांडेवाडी माध्यमिक विद्यालय (९१.४८) यांचा समावेश आहे. तसेच सर्वांत कमी निकाल माध्यमिक विद्यालय, पिंपरीनगर (७०.८३) या शाळेचा लागला आहे.**

वर्षभर सातत्याने विद्यार्थी गुणवत्ता वाढीचे अनेक उपक्रम माध्यमिक शिक्षण विभागामार्फत राबविले जातात. बहुतांश विद्यार्थी गरीब कुटुंबातून येतात. त्यांच्यासाठी वर्षभर नियमित परिक्षांबरोबरच सर्व विषयांच्या केंद्रीय परीक्षा, सराव परीक्षा घेण्यात येतात. यातून विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेस सामोरे जाणे सोपे जाते. मार्च 2024 च्या एस.एस.सी.बोर्डाच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा निकाल 95.52 व ऊर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा निकाल 98.21 ,त्यानुसार मनपाच्या मराठी व ऊर्दू माध्यमाचा एकूण निकाल 95.36 एवढा लागलेला आहे. 90% व त्यापुढे गुण मिळवणारे एकूण 23 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 1 लाख रूपये, 85 % ते 89.99 % पर्यंत गुण मिळवणारे 67 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50 हजार व 80 % ते 84.99% गुण मिळवणा-या 112 विद्यार्थ्यांना 25 हजार तसेच दिव्यांग असलेले 18 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50 हजार याप्रमाणे मनपामार्फत गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस रक्कम देण्यात येणार आहे.

# गुरुवारी शहरातील संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद

## महापालिका प्रशासनाचे रहिवाशांना आवाहन : पाणी काटकसरीने वापरा, प्रशासनाला सहकार्य करा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील निगडी याठिकाणी असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्तीची कामे तसेच शहरातील वितरण व्यवस्थेमधील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेणे आवश्यक असल्यामुळे गुरुवारी ३० मे रोजी पिंपरी चिंचवड शहराचा संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने निगडी, सेक्टर क्र.२३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्तीची आवश्यक कामे यासह शहरातील वितरण व्यवस्थेमधील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे गुरुवारी ३० मे २०२४ रोजी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येईल. तसेच सकाळचा पाणीपुरवठा नियमित वेळेनुसार सुरु राहणार आहे. शहरातील सर्व भागात दुस-या दिवशी म्हणजेच शुक्रवार ३१ मे २०२४ रोजी सकाळी पाणीपुरवठा अनियमित आणि कमी दाबाने होईल, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली आहे.



महापालिकेच्या हद्दीतील नागरिकांनी मनपाकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने पाणी वापरावे व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुण्यात पाच बांगलादेशींना अटक

## पिंपरी चिंचवड येथे दहशतवादविरोधी पथकाने 5 बांगलादेशी नागरिकांना अटक

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड दहशतवादी विरोधी पथकाने बनावट कागद पत्रांसह 5 बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. दहशतवादी विरोधी पथकाने बनावट कागदपत्रांसह भारतात बेकायदेशीररित्या राहणाऱ्या 5 जणांना अटक केली आहे. ही कारवाई भोसरी भागातील शांतीनगर परिसरात करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी शमीम नुरोल राणा, राज उर्फ सम्राट सदन अधिकारी, जलील नरू शेख उर्फ जलील नूर मोहम्मद गोलदार ,वसीम अजीज उलहक मंडल उर्फ वसीम अजीऊल हक हिरा, आझाद शमशुल शेख उर्फ अबुल कलाम शमशुद्दिन फकीर या पाच बांगलादेशी



नागरिकांना अटक केली आहे. त्यांना बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी हे बांगलादेशी नागरिक असून त्यांच्याकडे कोणताही परवाना किंवा वैध कागदपत्र नाही. तरीही ते पिंपरी चिंचवड येथे राहत होते. ते बेकायदेशीररित्या भारतात बनावट आधार कार्ड, जन्माचा दाखला आणि शाळा सोडल्याचा दाखला, पासपोर्ट बनवून राहत होते. दशहतवाद विरोधी पथकाला याची माहिती मिळताच त्यांनी छापा टाकून पाचही नागरिकांना अटक केली आहे.

दरम्यान, पुण्यात मोठा घातपात घडवण्याचा कट आखणाऱ्या दहशतावाद्यांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आलं होतं. पुणे पोलिसांनी गेल्यावर्षी दोन दहशतवाद्यांना अटक केली होती. पुणे पोलिसांनी एका मोटारसायकल चोरी प्रकरणाचा शोध घेत होते. त्यावेळी इम्रान खान आणि मोहम्मद युनूस साकी या दोघांची चौकशी केली असता ते घाबरले. यामुळे पोलिसांना संशय आला. त्यांच्या घराची तपासणी केली असता आक्षेपार्ह साहित्य मिळाले होते. त्यावेळी त्यांचा तिसरा साथीदार फरार झाला होता. त्यानंतर पोलिसांच्या चौकशीत ते एनआयएच्या यादीत असणारे मोस्ट वॉंटेड दहशतवादी असल्याचे स्पष्ट झालं होतं.

### आरोपींवर गुन्हा दाखल

आरोपींकडून पोलिसांनी सिम कार्ड, अकरा हजार रुपये किमतीचा मोबाईल, एअरटेल कंपनीचे सिम आदी साहित्य जप्त केले आहे. त्यांच्यावर परकीय नागरिक कायदा पारपत्र अधिनियम आणि भारतात प्रवेश करण्याचा नियम यानुसार गुन्हे दाखल केले आहेत. बांगलादेशचे हे नागरीक नेमकं कोणत्या हेतूने पिंपरी चिंचवडमध्ये राहत होते, त्यांचा कुठलाही वाईट हेतू तर नव्हता ना? या दृष्टीनेदेखील तपास केला जाणार आहे.

# प्रेयसीच्या मित्राच्या अंगावर प्रियकराने चार चाकी चढवली

## प्रेयसीला भेटायला आलेल्या एक्स बॉयफ्रेंडला प्रियकराने कारने उडवले : बॉयफ्रेंड गंभीर जखमी

**पुणे | प्रतिनिधी**

आपली प्रेयसी दुसऱ्या मुलासोबत बोलत आहे याचा राग मनात धरून एका प्रियकराने आपल्या प्रेयसीच्या मित्राच्या अंगावर चार चाकी वाहन चालवून त्याला चिरडण्याचा प्रयत्न केला आहे. पिंपरी चिंचवड शहरात काल मध्य रात्री यशवंत नगर येथील शंकर चौधरी चौक परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमध्ये सदरील मुलगा हा गंभिर जखमी झाला असून त्याच्यावरती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय सी एम रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. सुशील काळे असे अंगावर चारचाकी गाडी घालणाऱ्या माथेफिरू तरुणाचे नाव असून या अपघातात निलेश शिंदे हा तरुण गंभीर जखमी झाला आहे.

आपली प्रेयसी निलेश शिंदे या तरुणासोबत बोलत



थांबल्याचे पाहून राग अनावर झाल्याने सुशील काळेने आपली चार चाकी किया गाडी निलेश शिंदे यांच्या अंगावर घालून त्याला चिरडून ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणात पिंपरी पोलिसांनी आरोपी सुशील काळे यांच्या विरोधात भा द वी 307 कलमअंतर्गत खूनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्तांनी सांगितलं आहे.

ही घटना मध्यरात्री एकच्या सुमारास टेल्को रोड यशवंत नगर या ठिकाणी घडलेली आहे. निलेश शिंदे आणि सुशील काळे याची गर्लफ्रेंड एकच आहे. सध्या त्या युवतीचे सुशील काळे सोबत प्रेमसंबंध असून ती निलेश पासून दूर झालेली आहे. निलेश या तिला त्रास देत होत असत त्या प्रेयसीच म्हणणं आहे. रात्री उशिरा एक्स बॉय फ्रेंड निलेश हा युवतीला भेटायला आला होता. याबाबतची माहिती तरुणीने सुशीलला दिली. निलेश जेव्हा भेटायला आला तो युवतीशी बोलत होता त्यावेळी सुशीलने चारचाकी गाडीने निलेशला उडवलं. यात तो गंभीर जखमी झाला.

पुण्यात मागील काही दिवसांपासून बळजबरी करुन किंवा क्षुल्लक कारणावरुन अनेक राडे होताना पाहायला मिळत आहे. कधी माझ्याकडे डोळे वर करुन का पाहिलं तर कधी मी भाई आहे मला भाई म्हण, म्हणत एकमेकांवर कोयते हल्ले करताना दिसत आहेत. यातच प्रेम प्रकरणातूनदेखील अनेक राडे होताना पाहायला मिळतात. त्यातच आता एक्स बॉयफ्रेंड गर्लफ्रेंडला भेटायला आला म्हणून प्रियकराने संतापाच्या भरात कार अंगावर घातली आहे. यात एक्स ब़ॉयफ्रेंड जखमी झाला आहे.

# 'गेमिंग झोन'बाबत प्रशासनच अनभिज्ञ


## मनोरंजनाचे वेगवेगळी साधने उपलब्ध त्यातीलच आधुनिक साधन म्हणजे 'गेमिंग झोन'

**पिंपरी | प्रतिनिधी**

मनोरंजनाचे वेगवेगळी साधने उपलब्ध आहेत. त्यातीलच एक आधुनिक साधन म्हणजे 'गेमिंग झोन.' अशी साठपेक्षा अधिक गेमिंग झोन शहरात असावीत, असा प्रशासनाचा अंदाज असून, गुगल मॅपिंगवरूनही दिसत आहे. मात्र, अग्निसुरक्षेच्या दृष्टिने महापालिकेच्या अग्निशमन दलाकडे एकाही गेमिंग झोनची नोंद नसल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिवाशी 'खेळ' सुरू आहे का, असा प्रश्न पडतो.

गुजरातमधील राजकोट येथील गेमिंग झोनला आग लागून २८ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या गेमिंग झोनच्या परिसरात फ्युएल टायर, फायबर ग्लास शेड्स आणि थर्माकोल शीट्स ठेवलेले होते. त्या परिसरात वेल्डिंगचे काम सुरू असताना ठिणगी उडून आग लागल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून दिसत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील गेमिंग झोनचा आढावा घेतला असता, अनेक त्रुटी आढळून आल्या.

गंभीर बाब म्हणजे, महापालिका अग्निशमन दलाकडे एकाही गेमिंग झोनची नोंद नाही. त्यामुळे राजकोटसारखी घटना घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण, गुगल इमेजचा आधार घेतल्यास जुनी सांगवी, नवी सांगवी, दापोडी, भोसरी, पिंपरी, चिंचवड, काळेवाडी, पिंपळे सौदागर, रहाटणी, वाकड, थेरगाव, रावेत, निगडी, आकुर्डी, संभाजीनगर, संत तुकारानगर आदी दाट लोकवस्तीच्या भागात अधिक गेमिंग झोन असल्याचे दिसत आहे अग्निसुरक्षा साधने प्रत्येक गेमिंग झोनमध्ये असायला हवे, असे एका प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.



### अग्निशमनचे ना-हरकत हवे

» शहरातील गेमिंग झोन संचालक व मालकांनी अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे. अनेक जण केवळ शॉप अॅक्ट लायसन्स (दुकान परवाना) काढतात. त्यासाठी ओळखीचा पुरावा म्हणून पॅन कार्ड, पासपोर्ट, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक किंवा मतदार ओळखपत्र यापैकी एक आणि पत्त्याचा पुरावा म्हणून भाडेकरार वा त्याची पावती, टेलिफोन बिल, वीज बिल, खेरदी-विक्री करार, मालमत्ता कर पावती आदींपैकी एका पुराव्याची आवश्यकता असते. यासोबतच अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र सक्तीचे केल्यास गेमिंग झोनची आपोआप नोंद राहील, अशी अपेक्षाही अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### गेम झोन म्हणजे काय?

» गेम झोन हे मनोरंजनाचे एक साधन आहे. या ठिकाणी नागरिका व्हिडिओ गेम खेळण्यासाठी येतात. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंतचा समावेश असतो. असे 'गेम' एकट्याने किंवा कुटुंबीयांसमवेत किंवा मित्रांसमवेत खेळता येतात. झोनमध्ये गेमिंग मशिन असतात. व्यापारी संकुले, मॉल्स किंवा बाजारपेठेत, शॉपिंग स्ट्रिट परिसरात गेमिंग झोन असतात.

> शहरातील गेमिंग झोन संचालक व मालकांनी अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे. त्यासाठी अर्ज करावा. तो प्राप्त झाल्यानंतर अग्निशमन दलाचे अधिकारी जागेवर जाऊन तपासणी करतील. अग्निसुरक्षेच्या दृष्टीने त्रुटी आढळल्यास उपाययोजनांची पूर्तता करण्याबाबत सूचना करतील. नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निसुरक्षा यंत्रणा उभारणे गरजेचे आहे.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, अग्निशमन विभागप्रमुख, महापालिका**

# आयटी क्षेत्रातील हालचालींना वेग तिमाहीत बोनसला कात्री

## तिमाही बोनसमध्ये काही कंपन्या 20 ते 40 टक्क्यांपर्यंत कात्री लावणार असल्याच्या चर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगभरात सध्या मंदीचे वारे वाहत आहे. परंतु भारतात मात्र याचा परिणाम दिसून येत नाही. एकीकडे जगभरातील आयटी आणि इतर कॉर्पोरेट कंपन्या कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवित आहे, तिथे भारतात मात्र कंपन्या मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांची भरती करत आहेत.

याचाच अर्थ की भारतीय कंपन्या चांगले काम करत आहेत. अशा परिस्थितीत पहिल्या आर्थिक तिमाहीच्या बोनसमध्ये काही कंपन्या 20 ते 40 टक्क्यांपर्यंत कात्री लावणार असल्याच्या चर्चांनी आयटी क्षेत्रातील वातावरण ढवळून निघाले आहे. एका बड्या कंपनी याबाबत घोषणाही केली आहे.

जगातील बहुतेक पाश्चात्य देश सध्या महागाई आणि मंदीशी झुंज देत आहेत. अनेक कंपन्यांनी मोठ्या संख्येने कर्मचारी कपात करत खर्च आणि उत्पन्न यात संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तशी परिस्थिती भारतात दिसत नाही. या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे की, भारतीय कंपन्या परिस्थिती खूपच शांतपणे हातळत आहेत.

ते कमी पगारावर फ्रेशर्स भरती करत आहेत आणि मोठ्या पगाराच्या कर्मचाऱ्यांवरील कंपनीचे निर्भरता कमी करत आहेत. बड्या कॉर्पोरेट आणि आयटी कंपन्या इतर भारतीय कंपन्यांप्रमाणे दिवाळीला बोनस न देता आर्थिक वर्ष संपले की बोनस देत होत्या. एकाच वेळी भार वाढत असल्याने कंपन्यांनी दर तीन महिन्याला कर्मचाऱ्याच्या कामानुसार बोनस देण्यास सुरुवात केली. एका बड्या भारतीय आयटी कंपनीने मे महिन्याच्या अखेरीस बोनसमध्ये कपातीचे धोरण स्पष्ट केले आहे. दुसऱ्या एका बड्या भारतीय आयटी कंपनीने शंभर टक्के वर्क फ्रॉम ऑफिसचा आग्रह धरला आहे.




### का घ्यावे लागले असे निर्णय ?

» आयटी कंपन्यांचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने विकसित पाश्चात्य देश आहेत. परंतु हे देश सध्या मोठ्या प्रमाणात मंदीला तोंड देत आहेत. भविष्यात याचा भारतीय कंपन्यांवर परिणाम होण्याची शक्यता पाहता आतापासूनच कंपन्या तयारी करत आहेत. कंपनीच्या एकूण नफा घसरल्यास शेयर मार्केटमध्ये याचा विपरीत परिणाम होतो. ही बाब लक्षात घेता आतापासून संतुलन साधण्याचा प्रयत्न होत आहे. कंपन्यांना मार्केटमध्ये टिकून राहण्यासाठी हे निर्णय गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात. ले-ऑफ अर्थात एकाच वेळी मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना नोकरीवरुन काढून टाकणे. पाश्चात्य देशातून मोठ्या प्रमाणात ले-ऑफच्या बातम्या गेल्या काही महिन्यांपासून धडकत आहेत.

### सोशल मीडियावरील चर्चा

» आयटी कंपन्याच्या कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडियावरील विविध ग्रुप्स आणि पेजवर आयटी प्रोफेशनल्स याबाबत व्यक्त होत आहेत. यात प्रामुख्याने कंपन्याचे अति वरिष्ठ अधिकारी आणि संचालक यांच्या पगाराबाबत चर्चा होत आहे. एकीकडे आठवड्यात 70 तास काम करण्याचा आग्रह आणि दुसरीकडे बोनस कपात करण्याच्या धोरणावर टीका केली जात आहे. पाश्चात्य देशांमधील मंदीमुळे यंदा अपेक्षित पगारवाढही झाली नसल्याचे काही आयटीयन्सचे मत आहे.

# भ्रष्ट यंत्रणेमुळे 'ससून'ची लक्तरे चव्हाट्यावर!

## ससून रुग्णालयात सलग घडलेल्या घटनांमुळे कारभाराची लक्तरे पुन्हा एकदा चव्हाट्यावर

**पुणे | प्रतिनिधी**

ससूनमध्ये सध्या काय सुरू आहे तर रक्ताचे सॅम्पल बदलले जातात, पैसे घेऊन हवे तसे पेपर रंगविले जातात, अटकेत असलेल्या रुग्णांना उपचारांच्या नावाखाली हव्या असलेल्या सगळ्या सुविधा मिळतात. इतकेच नाही, तर डॉक्टरच रुग्णालयात मद्यपार्टी करतात राजकीय हस्तक्षेप, लागेबांधे, वशीला आदींमुळे या रुग्णालयाची प्रशाकीय व्यवस्था पुरती पोखरली असून, रुग्णांसाठी ससूनचा आधार हरवत चालला आहे. या रुग्णालयात सलग घडलेल्या घटनांमुळे येथील कारभाराची लक्तरे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहेत.

गोरगरीब रुग्णांना उपचार मिळावेत, म्हणून १८६७ मध्ये ब्रिटिशांनी स्थापन केलेल्या या रुग्णालयातील प्रशासकीय कारभार कायमच चर्चेत राहिला आहे. कधी अधिकाऱ्यांतील गटबाजी, तर 'सीएसआर'मधून मिळालेल्या वस्तूंचा अपहार, औषधांचा गैरव्यवहार, मृतदेहाची अदलाबदली, कर्मचाऱ्यांची मुजोरी, अतिदक्षता विभागात कुत्री, मांजरे आणि उंदरांचा संचार आदी अनेक प्रकार रुग्णांनी या रुग्णालयात अनुभवले आहेत.बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचा लौकीक आजही देशात मोठा आहे. परंतु त्याला संलग्न असलेल्या या रुग्णालयाचा कारभार गेल्या काही वर्षांपासून ढासळता आहे. एकेकाळी या रुग्णालयात नियुक्ती मिळविणे, प्रतिष्ठेचे लक्षण समजले जायचे.

या रुग्णालयावर पुणे जिल्ह्यासह सोलापूर, लातूर, बीड, उस्मानाबाद, सातारा, सांगली, नगर आदी भागांतील रुग्ण अजूनही अवंलबून आहेत.म्हणूनच येथे रोज सुमारे ३ हजार रुग्ण येथील ओपीडीत येतात. त्यांच्यावर उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरही आहेत. परंतु, अधिष्ठाता, अधीक्षक, प्रशासक आदी पदांसाठीची स्पर्धा इतकी तीव्र आहे की, तेथे नियुक्तीसाठी थेट मंत्रालयातच वशीला लावावा लागतो.

कल्याणीनगरमधील अपघाताच्या प्रकारणातही येथील डॉ. श्रीहरी हाळनोर आणि डॉ. अजय तावरे यांनी रक्ताचे सॅम्पल बदलण्याचे धारिष्ट्य दाखविले, यातूनच रुग्णालयाच्या कारभारावर 'उजेड' पडला. ससूनचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते उपलब्ध झाले नाहीत.



> रक्ता चे सॅम्पल बदलल्याच्या आरोपावरून पोलिसांनी अटक केलेले ससून रुग्णालयातील डॉ. श्रीहरी हाळनोर आणि डॉ. अजय तावरे यांना नोटीस पाठवून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल.
>
> - डॉ. विंकी रुघवाणी, प्रशासक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई.

> मी लोकप्रतिनिधी असल्याने अनेक जण माझ्याकडे शाळा प्रवेश, वैद्यकीय उपचार, विनंती बदलीसाठी शिफारसपत्र घेण्यासाठी येतात. तसेच प्रत्येक शिफारस पत्राच्या खाली कायदेशीर बाबींची पूर्तता करून योग्य ती कार्यवाही करावी, असा उल्लेख असतो. त्यामुळे या विषयाला वेगळे वळण देणे योग्य नाही. माझा न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास असून, चौकशीअंती ही बाब स्पष्ट होईल.
>
> - सुनिल टिंगरे, आमदार.

### आमदार टिंगरेंच डॉ. तावरे यांच्यासाठी आग्रही !

» डॉ. अजय तावरे यांच्याकडे वैद्यकीय अधीक्षकपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात यावा, अशी मागणी आमदार सुनील टिंगरे यांनी अगदी सहा महिन्यांपूर्वीच वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे एका पत्राद्वारे केली होती. मंत्री आणि आमदार एकाच पक्षाचे असल्यामुळे मुश्रीफ यांनीही तत्काळ टिंगरे यांची मागणी मान्य करीत डॉ. तावरे यांच्याकडे 'मलईदार' अधीक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याचा आदेश दिला. डॉ. तावरे यांना अटक झाल्यावर टिंगरे यांचे पत्र सोशल मीडियावर 'व्हायरल' झाले.

# खडकवासला धरणात महिनाभराचेच पाणी शिल्लक

## खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून सध्या फक्त 5.71 टीएमसी पाणी शिल्लक

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून सध्या फक्त ५.७१ टीएमसी पाणी शिल्लक.

पुणे शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील चार धरणांमध्ये मिळून सध्या फक्त ५.७१ टीएमसी पाणी शिल्लक आहे. या प्रकल्पांतील पाणीसाठ्याचे प्रमाण अवघे १९.५९ टक्के इतके आहे. गतवर्षीच्या आजच्या तारखेच्या तुलनेत हा पाणीसाठा १.७४ टीएमसी इतका कमी आहे.

पुणेकरांना जेमतेम महिनाभर हा पाणीसाठा पुरू शकणार आहे. यामुळे जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांत पाऊस न पडल्यास पुणेकरांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. या वृत्ताला जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे.



### उपयुक्त पाणीसाठा दहा टक्क्यांहून कमी

» पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पात टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला ही चार धरणे येतात. या चार धरणांमधील मिळून एकूण उपयुक्त पाणीसाठा हा २९.१५ टीएमसी इतका आहे. यापैकी सध्या केवळ ५.७१ टीएमसी पाणी शिल्लक आहे.

### 5.95 टक्के पाणीसाठा कमी

» खडकवासला प्रकल्पात गेल्या वर्षी आजच्या तारखेला ७.४५ टीएमसी पाणीसाठा होता. गतवर्षीच्या उपलब्ध पाणीसाठ्याचे हे प्रमाण २५.५४ टीएमसी इतके होते. गतवर्षीची आजच्या तारखेची आणि या वर्षीच्या आजच्या तारखेच्या टक्केवारीची तुलना केल्यास गतवर्षीच्या तुलनेत यंदा ५.९५ टक्के इतका पाणीसाठा कमी झाला आहे.

उपनगरांत सोसायट्यांना सध्या पाण्याची तहान भागविण्यासाठी लाखो रुपयं खर्च करावे लागत आहेत. महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा अपुरा आणि कमी दाबाने असल्याने त्यांना खासगी टँकरचे पाणी विकत आणावे लागते. त्यामुळे सोसायट्यांनी मेंटेनन्समध्ये वाढ केली असून, रहिवाशांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

उन्हाळा सुरु झाला की राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाणी टंचाई जाणवू लागते. पुण्यात धरणातील पाणीसाठा तळ गाठतो आहे. त्यामुळे पुढील मे- जून महिन्यामध्ये पुणेकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी पालिकेकडून काही नियम जारी करण्यात आले आहे. जून महिन्यामध्ये पुणेकरांना पाणी टंचाईला सामोरे जाण्याची शक्यता असल्याचा अंदाज आहे.